


---

१७/०८/२०१५

## 'मीच तो पेंडसे !' गोव्याचा बालचर शिक्षक

एक दिवस भाऊसाहेब म्हणाले, ' गोव्याहून पत्र आलं आहे, तिथे बालचर शिक्षक प्रशिक्षण वर्ग घेण्यासाठी कोणाला तरी पाठवा म्हणून. कोण जाईल? आप्पा, तू जातोस का?'

'हो, जातो की! पण दादांची परवानगी काढावी लागेल. आईची परवानगी काढावी लागेल.'

'काढ मग!'

ते प्रकरण काही इतकं सोपं नव्हतं. दादांनी – सुभाषचंद्रांनी बिलकुल मनावरच घेतलं नाही. आप्पा हिरमुसला, आईही 'जा' म्हणेना. रागावून झालं, रुसून झालं, अबोला करून झाला. काही उपयोग होईना. आणि जायचा दिवस तर उद्यावर येऊन ठेपला. मग शेवटचं अस्त्र बाहेर निघालं. यथास्थित मांडी घालून आप्पाजीराजे यांनी सूर लावला. हे रुदनास्त्र पहिल्यांदा आईवर परिणाम करून गेलं.

'एवढा जायचा हट्ट करतोय तर जाऊ दे!' अंबूताई म्हणाल्या. मग दादांनीही फार ताणून धरलं नाही. 'जा!' म्हणाले. रडणं थांबलं. आप्पानं उडीच मारली.

'मिळाली परवानगी! भाऊसाहेब, मिळाली परवानगी!' आणि दुसऱ्या दिवशी मोटारीत बसून स्वारी गोव्याला रवाना झाली देखील !

तिथं उतरवून घ्यायला काही मंडळी आली होती. त्यांनी विचारलं,

'श्रीयुत पेंडसे वर्ग घ्यायला येणार होते ना?'

अगदी घवघवीत हसून उत्तर मिळालं,

'मीच तो पेंडसे.'

हा चौदा वर्षांचा पोरगा काय शिकवणार अशा पंचायतीत असलेल्या गोवेकर मंडळींना दुसऱ्या दिवशी गोड धक्का बसला. आप्पाची बालचर कौशल्ये, आज्ञा, सर्वच बाबतीतली पकड प्रभावी होती. मोठ्या लाघवानं तो आपल्याहून मोठ्या मंडळींना शिकवत होता- स्वत:कडे मोठेपण न घेता. मंडळी अगदी राजीखुशीनं शिकली. आप्पा ज्यांच्याकडे राहात होता, ते नाईक तर या आर्जवी, तडफदार मुलावर लोभावूनच गेले!

वर्गाच्या समारोपाच्या दिवशी आप्पा पेंडसे यांना धन्यवाद देण्यासाठी सभा योजली होती. या अनपेक्षित सन्मानानं बावरलेले आपले बालचर शिक्षक बोलायला उठले. म्हणाले,

'आपण मला इथे बोलावलंत हे **आपलं** भाग्य आहे!'

श्रोतेही क्षणभर बावरले. मग हास्याचा एक स्फोट झाला. आणि त्यात वक्त्याचे – '........ नव्हे – नव्हे **माझं** महद्भाग्य आहे!' हे शब्द लोपून गेले.